वर्ष १२ वे * अंक ४१ वा * गुरुवार, दिनांक १३ मार्च २०२५ ते बुधवार, दिनांक १९ मार्च २०२५ * रायगड * महाराष्ट्र * मुल्य २ रुपये * पृष्ठे ४

रायगड लोकधारा
बातम्या आणि जाहिरातीसाठी
संपर्क साधा :- ८३६९३९४३७२
सा.रायगड लोकधारा वृत्तपत्र /
रायगड लोकधारा न्यूज चॅनल

अन्यायाला वाचा फोडणारे....
ज्वलंत एकमेव वृत्तपत्र....
रायगडसह मुंबई,नवी मुंबई मधून प्रकाशित...!
शब्दांना लेखणीची धार..!

# रायगड लोकधारा

RNI No. MAHMAR/2013/48622
संपादकः विजय चंद्रकांत गायकर

## पनवेलमध्ये चार बांगलादेशी नागरिकांना अटक

**सा.रायगड लोकधारा वृत्त/पनवेल प्रतिनिधी :** रेल्वेस्थानकासमोरील झोपडपट्टीत अनेक दिवसांपासून बांगलादेशी नागरिक बेकायदा वास्तव्य करत असल्याचे उजेडात आले आहे. पनवेल शहर पोलिसांच्या कारवाईत ही माहिती उघड झाली. पोलिसांनी या प्रकरणातील बेकायदा राहणाऱ्या चार बांगलादेशींना अटक केली. यात तीन पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी बेकायदा वास्तव्य करणार्या बांगलादेशींना पकडण्यासाठी आदेश दिले का आहेत. यामुळे बेकायदा वास्तव्य करणाऱ्या विरोधात कारवाईसाठी स्थानिक पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी सुद्धा पोलीस कर्मचाऱ्यांना याबाबत दक्ष राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. पनवेल शहर पोलीस पथक पनवेल रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वारावरील झोपडपट्टीत चौकशीसाठी गेल्यावर त्यांना अब्दुल रशीद अकबर, मोहम्मद नाजमुल हुसेन खा, मोहम्मद रजोब अली खा आणि ५० वर्षीय नाजमा बेगम रशीद खाँ असे चौघे विना पारपत्र सापडले. हे बांगलादेशातील जाशोर जिल्ह्यातील राहणारे आहेत.

## दुर्गम भागातील विद्यार्थी सक्षम झाला पाहिजे हि आमची तळमळ - लोकनेते रामशेठ ठाकूर

### लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न




**सा.रायगडलोकधारा वृत्त/ पनवेल प्रतिनिधी :** रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज (दि. १२) मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय स्पर्धा, विद्यापीठ स्पर्धा, महाविद्यालयीन स्पर्धा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातून यशस्वी झालेला विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी दातृत्व, कर्तुत्व आणि मातृत्व या तीनही गोष्टींचा संगम असणारे व्यक्तिमत्व आणि मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रयत शिक्षण संस्था सातारा, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर हे होते. यावेळी त्यांनी विद्यापीठ व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत, महाविद्यालयीन स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून या महाविद्यालयासाठी काहीही कमी पडणार नाही याची दक्षता आम्ही घेऊ असे ते यावेळी म्हणाले. त्याचबरोबर त्यांनी महाविद्यालयाच्या विकासासाठी आणखी वीस लाख रुपये देणगी जाहीर केली. गेल्या ४० वर्षात या ठिकाणी शिक्षणासाठी खूप अडचणी होत्या पण त्या या महाविद्यालयाच्या अनुषंगाने गेल्या दोन वर्षात भरून निघाल्या असल्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अधोरेखित केले. आजचे युग स्पर्धेचे आहे आणि या स्पर्धेत तळागाळीत दुर्गम भागातील विद्यार्थी सक्षमपणे सामोरे पान २ वर...

### श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून

## अुथर्व जाधवला उच्च शिक्षणासाठी अडीच लाख रुपयांची आर्थिक मदत



**सा.रायगडलोकधारा वृत्त/ पनवेल प्रतिनिधी :** परदेशातील वैद्यकीय शिक्षणासाठी अथर्व हरीश जाधव याला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून अडीच लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. सदरचा धनादेश माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते अथर्वचे वडील हरीश जाधव यांच्याकडे दि. ११ सुपूर्द करण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या तीन दशकपेक्षा जास्त वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतः च्या पायावर उभे केले जाते. खारघर येथील अथर्व रशिया देशातील युरल स्टेट मेडिकल युनिर्व्हसिटी मध्ये ही एमबीबीएस हे वैद्यकीय शिक्षण घेणार आहे. त्यासाठी त्यांना आर्थिक मदतीची आवश्यकता होती. त्यानुसार मदत करण्यात आली असून मदतीचा धनादेश माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अथर्वच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी भटके विमुक्त आघाडीच्या महिला अध्यक्षा विद्या तामखेडे, मंडळाचे व्यवस्थापक अनिल कोळी उपस्थित होते.श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या या उपक्रमामुळे अनेक होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोठी मदत मिळते. अशा प्रकारे समाजातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. त्यामुळे अथर्व जाधवला दिलेल्या या आर्थिक सहाय्यामुळे त्याचे वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न साकार होण्यास मदत होणार आहे.

## नवजात कन्यारत्नाचा सन्मान



**सा.रायगड लोकधारा वृत्त/चिरनेर प्रतिनिधी :** उरण महिला सामाजिक शैक्षणिक अणि संस्कृतिक संस्थेच्यावतीने कन्यारत्न जन्मोत्सव उपक्रम नुकताच साजरा करण्यात आला. उरण तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत हद्दीतील विनायक गावातील चित्रा काठे या महिलेने ८ मार्च या जागतिक महिला दिनाच्या दिवशी एका कन्येला जन्म दिला. त्यामुळे माता चित्रा काठे आणि त्यांच्या नवजात बालिकेचा उरण महिला सामाजिक शैक्षणिक अणि सांस्कृतिक संस्थेच्यावतीने भेटवस्तू सन्मान करण्यात आला. यावेळी उरण संस्थेच्या अध्यक्षा गौरी देशपांडे, सचिव निशा शिरधनकर, उपाध्यक्षा कल्याणी दुखंडे, उपाध्यक्षा दीपा शिंदे, सदस्या संगीता पवार, ज्योत्स्ना येरुणकर, डॉ. हेमा वैशंपायन आदी उपस्थित होते.

## कर्जतमध्ये आंबेडकर चळवळीचा मोर्चा




**सा.रायगड लोकधारा वृत्त/नेरळ प्रतिनिधी :** बिहार राज्यातील बुद्धगया येथे बौद्ध भिकू यांच्याकडून महाबोधी मुक्ती आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी कर्जत येथे आंबेडकर चळवळीकडून मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथून निघालेला हा मोर्चा कर्जत स्टेशन रस्त्याने बाजारपेठेतून लोकमान्य टिळक चौकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे पोहोचला. त्यांनतर कर्जत पोलीस ठाणे आणि प्रांत अधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन देण्यात आले. या निवेदनात महाबोधि महाविहार ब्राम्हणी कर्मकांडापासून मुक्त करुन बौद्धांच्या हाती देण्यात यावे. बोधगया मंदिर कायदा १९४९ रद्द करण्यात यावे. तसेच, महाबोधी महाविहारात वैदिक कर्मकांडकरुन बौद्धाचे श्रध्दाभावना दुखवणारे पंडे पुरोहित यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

## महावितरण कंपनीचा मनमानी कारभार

### ग्राहक वर्गातून तीव्र संताप

**सा.रायगड लोकधारा वृत्त/कोलाड वार्ताहर :** रोहा तालुक्यातील खांब परिसरातील विज ग्राहकांना विज बिल भरण्याची अंतिम तारीख संपल्यानंतर महावितरण कंपनीकडून बिल मिळत आहेत. त्यामुळे विज ग्राहकांना अतिरिक्त विज आकार भरावा लागत आहे. त्याला जबाबदार कोण? अशी संतप्त प्रतिक्रिया विज ग्राहकांकडून होत आहे. तसेच, महावितरण कंपनीचा मनमानी कारभार चालू असल्याची चर्चा देखील होत आहे. महावितरण कंपनीने विज बिल वाटप करण्यासाठी कंत्राटी कामगार ठेवण्यात आले आहेत. त्यांना एका बिलाप्रमाणे ठराविक दर ठरवून दिले आहेत. परंतु, हे कामगार इतर ठिकाणी काम करून त्यांच्या सुट्टीच्या वेळात विज बिल वाटप करीत असल्याचे निदर्शनास येत आहेत. काही ठिकाणी विज बिल भरण्याची तारीख संपल्यानंतर बिलं मिळत आहेत. त्यामुळे विज ग्राहकांना अतिरिक्त विज बिल भरावे लागत आहे. या आधी महावितरण कंपनीकडून तीन महिन्यांनी विज बिल येत होते. त्यानंतर दोन महिन्यांनी तर काही वर्षापासुन ते विज बिल एक महिन्यांनी येऊ लागले आहे. परंतु, तीन महिन्यांनी येणाऱ्या विज बिलापेक्षा जास्त विज बिल एका महिन्याला येत आहे. त्यामध्ये ३४ युनिटला १६०.१४ रुपये होतात. परंतु, यामध्ये स्थिर आकार, वहन आकार, इंधन समायोजन आकार, १६% विज शुल्क याचे जवळ जवळ २३० रुपये असे एकूण ३९० ते ४०० रुपये विज ग्राहकांना लादले जातात. त्यामुळे विज बिल भरता भरता विज ग्राहकांचे पार कंबरडे मोडले आहे. यामध्ये विज बिल भरण्यासाठी विलंब झाला तर अतिरिक्त स्थिर आकार भरावा लगत आहे.

## सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील भरीव योगदान;

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर यांचा 'यमुना स्त्री सन्मान' पुरस्काराने सन्मान

**सा.रायगड लोकधारा वृत्त/ पनवेल प्रतिनिधी :** स्त्रिया म्हणजे केवळ माया, ममता आणि कुटुंबाचा आधार नाहीत, तर त्या जिद्द, मेहनत आणि कर्तृत्वाची मूर्तिमंत प्रतीक आहेत. इतिहासात तसेच आजच्या आधुनिक युगातही अनेक महिलांनी विविध क्षेत्रांत आपले नाव कोरले आहे. स्त्रिया फक्त घर सांभाळणाऱ्या किंवा समाजातील पारंपरिक भूमिका निभावणाऱ्या व्यक्ती नाहीत, तर त्या समाजाच्या प्रगतीचे आणि विकासाचे मुख्य आधारस्तंभ आहेत. त्यामध्ये आदरणीय व्यक्तिमत्व सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर यांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. त्या अनुषंगाने काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या मातोश्री दिवंगत यमुनाबाई तुकाराम घरत यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त यमुना शैक्षणिक सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या वतीने शेलघर येथे आज (दि. ११) संपन्न झालेल्या 'कर्तृत्वान महिलांचा सन्मान' सोहळ्यात सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते सौ. शंकुतला रामशेठ ठाकूर यांचा सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी 'यमुना स्त्री सन्मान' पुरस्काराने समारंभपुर्वक सन्मान करण्यात आला. दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सन्मान सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून सिनेअभिनेत्री मृणाल कुलकर्णी, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, दिबासाहेबांचे चिरंजीव अतुल पाटील, शिवसेनेचे संपर्क प्रमुख बबन पाटील, शिक्षकनेते दा.चा.कडू गुरुजी, संस्थेचे संस्थापक महेंद्र घरत, सचिव शुभांगी घरत, राम म्हात्रे, रघुनाथ घरत, राजेंद्र पडते, डॉ. मनीष पाटील, मिलिंद पाडगावकर, कामगारनेते वैभव पाटील, किरीट पाटील, आदी उपस्थित होते. थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबियांनी रयत शिक्षण संस्थेच्या विकासासाठी सातत्याने भरीव मदत करून या संस्थेच्या प्रगतीसाठी नेहमीच मोलाचा हातभार लावला आहे. आजपर्यंत १०० कोटीहून अधिक रुपयांची देणगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेला दिली आहे. कर्मवीर अण्णांच्या विचाराने प्रेरित होऊन त्यांचा शैक्षणिक वारसा जपण्याचे कार्य लोकनेते रामशेठ ठाकूर अखंडपणे करत आहेत.लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विधायक कामाला प्रोत्साहन देण्यासाठी नेहमी मुक्तहस्ते मदत केली आहे, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असलेल्या विद्यालयांना उभारी देण्याचे काम त्यांनी केले आहे. थोर समाजसुधारक स्वर्गीय जनार्दन भगत यांची कन्या आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेला कोट्यवधी रुपयांची देणगी दिली आहे. तसेच शिक्षण क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रात सौ. शकुंतला ठाकूर यांचे कार्य उल्लेखनीय असे आहे. चांगले विचार स्वतः आणि इतरांना घडविण्याचे काम करते. जन्माला येताना आणि मृत्यूनंतर खाली हात जावे लागते. माणुसकी आणि विचार अमर असतात. शैक्षणिकदृष्ट्या समाजाच्या विकासासाठी सर्वांनी सामाजिक कार्यात स्वतःला वाहून देणे गरजेचे आहे आणि याच सामाजिक भावनेतून लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबिय कार्य करीत असतात. समाजाचे आधारस्तंभ असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर राहिले आहेत आणि त्याचबरोबरीने त्यांच्या अर्धांगिनी सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर यांनीही सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात स्वतःला झोकून दिले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या विधायक कार्यात सौ. शकुंतला ठाकूर यांचा मोलाचा वाटा आहे. त्याबद्दल त्यांचा यमुना शैक्षणिक सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला.




### 'यमुना स्त्री सन्मान' पुरस्कार' ने यांचा झाला सन्मान

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर (सामाजिक व शैक्षणिक),
सुप्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी (कला )
प्रमदा बिडवे (प्रशासन )
डॉ. शीतल जोशी (वैद्यकीय )
डॉ. समिधा गांधी (वैद्यकीय )
डॉ. कीर्ती समुद्र (वैद्यकीय )
डॉ. प्रकाश निघूकर (वैद्यकीय )
डॉ. जिज्ञासा विजय कडू (वैद्यकीय )
सुरेखा म्हात्रे (शैक्षणिक )
अनुराधा उरसल (क्रीडा)
रिया पाटील (क्रीडा)
प्राची ठाकूर (कला )


पान १ वरून

### दुर्गम भागातील विद्यार्थी सक्षम झाला पाहिजे हि ....

जायला पाहिजे, ही आमची तळमळ असते त्यामुळे आपल्याकडून जेवढे करता येईल तेवढी मदत झाली पाहिजे हा उद्दिष्ट ठेवून मार्गक्रमण करत असल्याचे त्यांनी नमूद केले. या ठिकाणी गुणवंत प्राप्त विद्यार्थ्यांना मिळालेली बक्षिसांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, त्यामुळे निश्चितच या महाविद्यालयाने शिक्षणासह इतर क्षेत्रातही वेगाने विकास केला असल्याचे गौरवोद्गारही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी काढले. व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे यांनी सामाजिक आणि शैक्षणिक विकासामध्ये आपली संस्था ही महत्वाचे कार्य करीत आहे. म्हणून पारंपरिक शिक्षणाबरोबरच आपण तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण घेणे खूप गरजेचे आहे. त्याचबरोबर बदलत्या काळाबरोबर आपण बदललो पाहिजे ते मानवजातीच्या विकासासाठी महत्त्वाचे आहे. असेही ते यावेळी म्हणाले. कुठल्याही परिस्थितीत खचून न जाता जिद्द ठेवून चिकाटीने अभ्यास करीत रहा. नक्कीच तुम्ही ठरवलेल्या ध्येयापर्यंत पोहोचणार, असा सल्लाही शिंदे यांनी विद्यार्थ्यांना दिला. पालघर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम यांनीही आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. या सोहळ्याची सुरुवात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एन.चांदोरे यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षातील उल्लेखनीय कार्य व विविध उपक्रमांची माहिती दिली. महाविद्यालयातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल या वर्षीचा 'लोकनेते रामशेठ ठाकूर पुरस्कार' सीनियर प्रा. एस. ई. सैंदनशिव तर महाविद्यालयातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल या वर्षीचा 'ॲड.भगीरथ शिंदे पुरस्कार' ज्युनिअर प्रा. एस. ए. फुंदे यांना प्रदान करण्यात आला. या सोहळ्याला प्रमुख मान्यवर म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, महाविद्यालय विकास समिती सदस्य कुणाल लाडे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. ई. सैंदशिव, उपप्राचार्य डॉ. एस. जी. मेंगाळ, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. व्ही. एम. मोरे, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. एस. एच. जाधव, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, रयत शिक्षण या संस्थेच्या आश्रम शाळेचे प्रकल्प अधिकारी काकुळते सर, शेळके सर, काजळे सर, लंके सर, वाघमारे सर, हनीफ शेख, संदीप निकम, काशिनाथ कान्हव, फारुख पिंजारी, प्रशांत पाटील यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते.

# मुख्य रस्त्यालगत कचऱ्याचे ढीग

## • ठाण्यात रोगराई पसरण्याची भीती



**सा.रायगड लोकधारा वृत्त/ठाणे प्रतिनिधी :** वागळे इस्टेटमधील सीपी तलाव येथे कचरा हस्तांतरण केंद्रात कचरा टाकण्यासाठी विरोध होत असल्याने पालिकेने कचरा उचलणे बंद केले आहे. त्यामुळे दुसऱ्या दिवशीही ठाणेकरांची कचराकोंडी झालेली पाहायला मिळाली. गल्लोगल्ली फिरणाऱ्या घंटागाडीचालकांनी कचरा उचलणे बंद केल्याने मुख्य रस्त्यालगत कचऱ्याचे ढीग लागले आहेत. दरम्यान, सीपी तलाव डम्पिंगमधील कचऱ्याला पुन्हा आग लागल्याने प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली. सीपी तलाव येथील कचरा हस्तांतरण केंद्रातील कचऱ्याच्या ढिगाला शुक्रवारी लागलेल्या आगीमुळे केंद्रावर कचरा गाड्या आणण्यास स्थानिकांनी विरोध केला. यावर महापालिकेने अद्याप तोडगा काढला नसल्याने घंटागाड्या बंद करून शहराची कचराकुंडी करून ठेवली असल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. शहरात सक्षमपणे कचरा विल्हेवाटीची यंत्रणा उभारू शकली नसल्याने ठाणेकरांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावरील कचरा वेळीच उचलला जात नसल्याने रोगराई पसरण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

# गिरवले हद्दीत दहा घरकुले मंजूर



**सा.रायगड लोकधारा वृत्त/पनवेल वार्ताहर :** ग्रामपंचायत गिरवले हद्दीत अनुसूचित जमातीच्या १० कुटुंबांना पंतप्रधान पीएम जनमन घरकुल योजना अंतर्गत घरकुले मंजूर झाली आहेत. या घरांचा ग्रामपंचायतीच्यावतीने शुभारंभ करण्यात आला आहे. यावेळी सरपंच प्रताप हातमोडे, उपसरपंच महेंद्र गायकर, सदस्य केशव हातमोडे, रोहिणी हातमोडे, म नीषा हातमोडे, सोनम हातमोडे, अजय गायकर, ग्रामविकास अधिकारी सुरेश मोहिते, सुरेश हातमोडे, विलास राजगुडे, ग्राम पंचायत कर्मचारी यांच्यासह जेष्ठ नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिरनेर कळंबूसरे येथील जमिनीचे अधिकाऱ्यांकडून बळजबरीने सर्वेक्षण

## भांडवलदार, कंपनी प्रशासनाच्या फायद्यासाठी सर्वेक्षणाचा काम सुरु असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप.



**सा.रायगड लोकधारा वृत्त/उरण प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील बहू चर्चित विरार अलिबाग कोरीडोर प्रकल्प हा मुंबईमधून थेट रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथे जात आहे. दळणावळणाच्या दृष्टीने व प्रवाशाच्या दृष्टीने हा एक महत्वाचा पाऊल मानला जात आहे. मात्र हा प्रकल्प रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातून जात आहे. त्यातही कळंबूसरे गाव व चिरनेर गावातील जमीन या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात संपादित होणार आहे.त्याचा प्रश्न अजूनही मार्गी लागला नसताना आता नवीन ग्रीनफिल्ड राष्ट्रीय राजमार्ग (पागोटे -राष्ट्रीय राजमार्ग ३४८ ते चौक )हा प्रकल्प आला आहे.या प्रकल्पसाठी कळंबूसरे, चिरनेर गावातील स्थानिक भूमीपुत्रांना, शेतकऱ्यांना विश्वासात न घेता, कोणालाही नोटीस न पाठवता किंवा प्रसारमाध्यमा द्वारे न कळविता या प्रकल्पशी संबंधित (भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण )च्या अधिकाऱ्यांनी दिनांक १२/३/२०२५ रोजी सकाळी शेतकरी हजर नसताना, कोणालाही न कळविता, शेतकऱ्यांना विश्वासात न घेता कळंबूसरे, चिरनेरच्या शेतात जाऊन जमिनीचे सर्वेक्षण केले. यावेळी या सर्वेक्षणाला चे अधिकारी धीरज शहा, सागर रामटेके, मनिष हसोदे, नितीक्षा वाघमारे आदी अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता सकाळी लवकर जमिनीचे सर्वे केल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट पसरली. विशेष म्हणजे कळंबूसरे ग्रामपंचायत व चिरनेर ग्रामपंचायतनेही शेतकऱ्यांना कळविले नाही. च्या अधिकाऱ्यांनी दमदाटी करून सर्वे सुरु केल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी हे सर्वेक्षणाचे काम बंद पाडले. या प्रसंगी शेतकरी विक्रांत पाटील यांनी जोरदार युक्तिवाद करत,आक्रमक भूमिका घेऊन सर्वेचे काम बंद पाडले.त्यामुळे शेतकऱ्यांची बाजू मांडत त्यांना न्याय मिळवून देण्यात विक्रांत पाटील यांनी यावेळी महत्वाची भूमिका बजावली आहे. उपस्थित शेतकऱ्यांनी शासकीय अधिकाऱ्यांना वेगवेगळे प्रश्न विचारून निरुत्तरीत केले. व माघारी जाण्यास भाग पाडले. तणावपूर्ण परिस्थिती यावेळी निर्माण झाली होती. बंदोबस्त साठी उपस्थित असलेल्या पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने वातावरण शांत झाले. व अधिकारी माघे फिरकले.सर्वे करून हजारो एकर जमीन भांडवलदारांच्या, कंपनी प्रशासनाच्या घशात घालण्याचा डाव असून शेतकऱ्यांना कोणतेही नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यामुळे ही शेतकऱ्यांची पूर्णपणे फसवणूक आहे. त्यांना विश्वासात न घेता काम सुरु झाल्याने ते काम शेतकऱ्यांनी बंद पाडले. यानंतर कोणतेही सर्वे होऊ देणार नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. अगोदर सर्वांना कळवा, लेखी नोटीस दया. शेतकऱ्यांसोबत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठका लावा. आणि त्या नंतरच प्रकल्प मार्गी लावा अशी एकमुखी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यात लक्ष घालून शेतकऱ्यांना न्याय द्यावा. अशीही मागणी करण्यात आली आहे. या संदर्भातच्या अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला असता कोणतेही प्रतिक्रिया देण्यास त्यांनी मनाई केली.

# उरण आगारातुन कोकणात सोडण्यात आल्या होळीसाठी ज्यादा बसेस

## कोकणवासीय उत्कर्ष संस्थेच्या पाठपुराव्याला यश



**सा.रायगड लोकधारा वृत्त/उरण प्रतिनिधी :** कोकणात होळी सणासाठी प्रवास करताना कोकणी माणसाला कोणत्याही प्रकारची अडचणी येऊ नयेत, कोकणी माणसाचा प्रवास सुखाचा, सुलभ व्हावा, या दृष्टिकोनातून दरवर्षी कोकणवासीय उत्कर्ष संस्था (उरण)च्या पाठपुराव्याने उरण बस आगारातून कोकणात जाण्यासाठी व उरणमध्ये परत येण्यासाठी जादा बस सोडल्या जातात. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी कोकणवासीय उत्कर्ष संस्थे (उरण)तर्फे उरण बस आगारातून कोकणात जाण्यासाठी जादा बस सोडण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली होती या मागणीला आता यश आले असून उरण आगारातुन कोकणात जाण्यासाठी बसेस सोडण्यात आले आहेत.या जादा बस सोडण्यासाठी संस्थेचे सचिव रवींद्र चव्हाण, कार्याध्यक्ष नंदकुमार साळवी यांनी उरण बस आगार तसेच मुंबई कार्यालय, मुंबई उप विभाग कार्यालय येथे पत्रव्यव्हार केला होता. या पत्रव्यव्हाराला आता यश आले आहे.११मार्च ते १२ मार्च या दरम्यान बसेस उरण आगारातून सोडण्यात आले आहेत अशी माहिती कोकणवासीय उत्कर्ष संस्थेचे सचिव रविंद्र चव्हाण यांनी दिली.मुंबई कार्यालय, उपविभाग कार्यालय यांनी पत्रव्यवहाराला सकारात्मक प्रतिसाद दिला. विभागीय वाहतूक अधिकारी अमित गिरमे तसेच उरण आगाराचे व्यवस्थापक गीता कोंडार तसेच उरण आगार स्थानक प्रमुख अमोल दराडे यांनी या पत्रव्यवहाराची दखल घेत सकारात्मक प्रतिसाद देत प्रत्यक्ष अंमलबजावणी केल्याने या सर्वांचे कोकणवासीय उत्कर्ष संस्थेच्या पदाधिकारी सदस्यांनी विशेष आभार मानले आहेत.

# पालखी महामार्गावरील पूल वापराविनाच जमीनदोस्त

**सा.रायगड लोकधारा वृत्त/पुणे प्रतिनिधी :** पालखी महार्गावरील फुरसुंगी ते वडकी दरम्यान जुने असलेले आठ पूल पाडण्यात येत आहेत. पूल एकदाही वाहतुकीसाठी वापरता न आल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. पालखी महामार्गाचे फुरसुंगी ते सासवड या टप्प्यातील काम सध्या सुरु आहे. या मार्गावर वडकीपर्यंत ओढे आणि नाल्यांवर आठ पूल दहा वर्षांपूर्वी बांधण्यात आले होते. पूल बांधून तयार होते. मात्र, त्यावेळेस या पुलांकडे जाणाऱ्या मार्गाचे काम होऊ शकले नाही. त्यामुळे हे पूल वाहतुकीच्या प्रतिक्षेतच राहिले. यावरून कधी एक दुचाकीही गेली नाही. नवीन महामार्गाच्या कामात येथील जुने पूल सध्या



पाडून त्याच ठिकाणी नवीन पूल बांधण्यात येत आहेत. मात्र, जुन्या पुलासाठी करण्यात आलेला खर्च वाया गेल्याने नागरिकांकडून खंत व्यक्त होत आहे.

> “ पूल बांधतानाच प्रशासनाने विचार करणे गरजेचे होते. पूल बांधून जर वापराविनाच पडावा लागत असेल तर हा जनतेच्या पैश्याचा अपव्यय नाही का? प्रशासनाच्या दूरदृष्टीचे प्रदर्शन होत आहे. पूल पुन्हा बांधण्यासाठी करोडोंचा खर्च होणार आहे. – आकाश बहुले, ग्रामस्थ, उरुळी देवाची ”

# उरण येथे महिलांसाठी आरोग्य शिबीर उत्साहात



**सा.रायगडलोकधारा वृत्त/उरण प्रतिनिधी :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून उरण मेडिकल वेल्फेअर असोसिएशन आणि इंडियन कॅन्सर ट्रीटमेंट सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने ब्रेस्ट कॅन्सर जनजागृती व मोफत थर्मल मेमोग्राफी शिबिर आयोजित करण्यात आले. हे शिबीर ९ ते १० मार्च रोजी हॉटेल भोईर गार्डन, कोट नाका, उरण येथे पार पडले. या शिबिरात १४२ महिलांचे मोफत कॅन्सर स्क्रीनिंग करण्यात आले. महिलांच्या आरोग्यविषयक जनजागृतीसाठी व त्यांना आवश्यक वैद्यकीय मदत मिळावी यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. या शिबिराच्या आयोजनामध्ये उरण मेडिकल वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. घनश्याम पाटील, डॉ. सलील पाटकर, सेक्रेटरी डॉ. सत्या ठाकरे, खजिनदार डॉ. सचिन गावंड आणि इतर मान्यवर डॉक्टरांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यामध्ये वुमेन ऑफ विस्डम सामाजिक व शैक्षणिक संस्था उरण, कुटुंबिनी महिला संघ उरण, कलश एंटरटेनमेंट, माई फाऊंडेशन, पत्रकार उत्कर्ष समिती, स्व. तृप्ती सुधीर सुर्वे फाऊंडेशन, महालन सामाजिक संस्था उरण, आधार फाऊंडेशन आदींचा सहभाग होता.

## पाणीयोजनेसाठी दोन वेळा करोडोंचा खर्च

# हंडा रिकामाच



| अलिबाग | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील डावा व उजव्या तीरावर वसलेल्या २६ गावांतील पाण्याचा प्रश्न भीषण होऊ लागला आहे. योजनेसाठी दोन वेळा ६० कोटींहून अधिक रुपये खर्च करूनदेखील या गावांतील महिलांच्या डोक्यावरील हंडा रिकामाच आहे. येथील महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. अखेर या महिलांनी पाण्यासाठी आमरण उपोषणाचे हत्यार उगारले आहे. पान २ वर

**52** हजारांहून अधिक लोक तहानलेलेच


**60** कोटींहून अधिक खर्च

**26** गावांवर पाणीसंकट

महिलांना पाण्यासाठी करावी लागतेय वणवण

**2.2** एमएलडी दरदिवशी पाणी

पाणी नसल्याने नागरिकांचे हाल







### एमआयडीसी विभाग अनभिज्ञ

एमआयडीसीमार्फत दररोज सरासरी २.२ ते ३ एमएलडी लीटर इतका पाणीपुरवठा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे पाठविला जातो. वितरण व्यवस्था महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची असून, जिल्हा परिषदेच्या नावाने या गावांसाठी कनेक्शन घेण्यात आले असल्याची माहिती एम आयडीसी विभागाकडून मिळाली आहे. मात्र, ते पाणी त्यानंतर कुठे जाते याबाबत एमआयडीसी विभाग अनभिज्ञ असल्याची माहिती समोर येत आहे.



● शेणवई येथील पाण्याची टाकी.

> पाण्याची मागणी वाढल्याने एमआयडीसीमार्फत कमी पाणीपुरवठा उपलब्ध होत आहे. त्यामुळे जलजीवन मिशन अंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत ३८ कोटी रुपयांची योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचे काम सुरु आहे.
>
> – मुनाफ शेख, उपअभियंता, एमआयडीसी

> गेल्या अनेक वर्षांपासून पाण्याची योजना गावात राबविली. परंतु, आजतागायत गावात पाणी नाही. करोडो रुपये खर्च करण्यात आले आहेत. प्रत्यक्षात मात्र आजही योजनेचा लाभ मिळाला नाही. पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. उजव्या तीरावरील खारापटी हे सुरुवातीचे गाव आहे. या गावातच पाणी येत नाही. पुढच्या गावांची काय स्थिती असणार, असा प्रश्न निर्माण होत आहे. करोडो रुपये खर्च करूनही पाणी नसल्याने कुंपणच शेत खात असल्याचा प्रकार सुरू आहे.
>
> – मेधा खरीवले, भातसई



● केमिकलयुक्त पाण्यामुळे कुंडलिका नदी प्रदूषित झाल्याने तिचे पाणी वापरण्यायोग्य नाही.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, विजय चंद्रकांत गायकर यांनी रोशन प्रिंटर्स, शॉप नं.०४ / ०५, प्रकाश निवास, प्लॉट नं.१३४/ ०१, आगरी समाज हॉल जवळ, पनवेल, रायगड महाराष्ट्र - ४१० २०६ येथे छापून मु. पो. पोयंजे, ता. पनवेल , जि. रायगड, महाराष्ट्र - ४१० २०६ येथून प्रकाशित केले. लेखांतून व्यक्त होणाऱ्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पनवेल न्याय कक्षेत. ( ८३६९३९४३७२ / ९१३६५३९५६० ) / Facebook :- vijay gaikar / Whatsapp No. ९१३६५३९५६० /
संपादक : विजय चंद्रकांत गायकर Email Id :- Gaikarvijay26@gmail.com RNI No. MAHMAR/2013/48622